महाराष्ट्र शासन
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१
www.dvet.gov.in ; desk14@dvet.gov.in ; ०२२-२२६२०६०४/२९३

क्र.१४/मालमत्ता/अतिक्रमण/२०२५/१६६ दिनांक:- १३/०५/२०२५

परिपत्रक

विषय:- संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये/संस्थांच्या मालकीच्या जागेवर अतिक्रमण होण्यापासून प्रतिबंध करणे तसेच झालेले अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करणे बाबत.

संदर्भ:- १. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. कडोंमपा-१००६/प्र.क्र.१९२/२००६/नवि-२८, दिनांक ०२/०३/२००९
२. महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्र.जमीन-०३/२००९/प्र.क्र.१३/ज-१ दिनांक ०७/०९/२०१०
३. महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र.जमीन-०७/२०१३/प्र.क्र.३७४/ज-१ दि. १०/१०/२०२३

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, महालेखापाल कार्यालयाने लेखापरीक्षणादरम्यान संचालनालयाच्या अधिपत्याखालील १८ औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये अतिक्रमण झालेले असल्याबाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्या अनुषंगाने, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यालये/संस्थांच्या जागेमध्ये अतिक्रमण होण्यास प्रतिबंध करणे तसेच झालेले अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करणे याबाबत खालील प्रमाणे मार्गदर्शन सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. सर्व संस्थांचे संरक्षण भिंतीचे बांधकाम पुर्ण असणे आवश्यक आहे. ज्या संस्थांनी संरक्षण भिंतीचे बांधकाम केलेले नाही त्यांनी तात्काळ संरक्षण भिंतीच्या बांधकामाची कार्यवाही पूर्ण करावी.

२. संस्थेच्या/कार्यालयाच्या जागेवर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर अतिक्रमण तात्काळ निष्काषित करण्याची कार्यवाही करावी.

३. ज्या संस्थांमध्ये अतिक्रमण झालेले आहे. त्या संस्थांची अतिक्रमण हटविण्याची जबाबदारी आहे. सदर अतिक्रमणाबाबत संदर्भाधीन क्र. १ ते ३ च्या शासन परिपत्रकान्वये कार्यवाही करण्यात यावी व तात्काळ दि. १०/१०/२०१३ च्या शासन परिपत्रका मधील मुद्या क्र. ०३ अन्वये कार्यवाही करावी.

४. ज्या संस्थांमध्ये भूसंपादन अतिक्रमणासह करण्यात आलेले आहे. अश्या संस्थांनी शक्य असल्यास मोजणी करुन अतिक्रमण झालेल्या जागेचा व उर्वरित अतिक्रमण रहित जागेचा असे दोन स्वतंत्र सात बारा तयार करण्यात यावेत.

५. ज्या संस्थामध्ये जुने वर्षानुवर्षे पूर्वीची अतिक्रमण आहेत अश्या संस्थांनी मोजणी करुन पुढील अतिक्रमणात वाढ होण्यास प्रतिबंध करणेसाठी उर्वरित संस्थेच्या जागेमध्ये तात्काळ संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यात यावे, जेणे करुन पुन्हा अतिक्रमण होणार नाही व संस्थेतील अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करावी.

(सतिश सुर्यवंशी)
संचालक

Laxman/letter/१४०